CIN: U29191PN2006PLC128377; E-mail Id: cs@shreeref.com

**August 27, 2025**

To,
Department of Corporate Services/ Listing
**BSE LIMITED**
25th Floor, P J Towers
Dalal Street, Mumbai-400001

**Subject: Submission of Newspaper Advertisement in connection with 19th Annual General Meeting of the Company for the financial year 2024-25.**

**Ref: Regulation 47 and Regulation 30 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

**Scrip Code: 544458**
**ISIN: INE0FMZ01045**
**Symbol: SHREEREF**

Dear Sir/Madam,

Pursuant to the provisions of Regulation 30 and Regulation 47 of the Securities Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements), Regulations, 2015, ("**SEBI Listing Regulations**"), the Company is hereby submitting the Newspaper Advertisement made in relation to the 19th Annual General Meeting of the Company to be held on Tuesday, September 23, 2025 at 10:00 A.M. at the Registered office of the Company situated at Plot. No. 131/12, Opp. MSEB Stores, Virwade Road, Ogalewadi, Karad, Maharashtra-415105, India for the financial year 2024-25.

The Advertisements appeared Today i.e., 27th August, 2025 in Time of India and Sakal Newspaper.

Kindly, take the above submissions on your record.

Thanking you,

**For and on behalf of**
**Shree Refrigerations Limited**
**(Formerly known as Shree Refrigerations Private Limited)**

Ravalnath Gopinath Shende
Digitally signed by Ravalnath Gopinath Shende
Date: 2025.08.27 15:52:59 +05'30'

**Ravalnath Gopinath Shende**
**Managing Director**
**DIN: 02028020**

## दृष्टिक्षेपात

### लडाखमध्ये पहिली बर्फवृष्टी

**लेह :** लडाखमधील उंच भागात हंगामातील पहिली बर्फवृष्टी मंगळवारी (ता. २६) झाली. याशिवाय लेह-लडाखमध्ये बहुतांश भागामध्ये पावसानेही हजेरी लावली. बहुतांश डोंगराळ भागामध्ये गेल्या २४ तासांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या बर्फवृष्टीची नोंद झाली आहे. खारदुंग ला टॉप, लेह पँगाँग लेक रस्ता, झांस्कर व्हॅलीतील बहुतांश भागामध्ये बर्फवृष्टी झाल्याचे सांगण्यात आले. लेह आणि कारगिल जिल्ह्यात पावसानेही हजेरी लावली. बर्फवृष्टी आणि पावसामुळे कोणत्याही हानीची नोंद नाही.

# भारतावर वाढीव आयातशुल्काचे विघ्न

## आता ५० टक्क्यांचा भार; वस्त्र, चामडे, दागिने उद्योगांवर होणार परिणाम



**नवी दिल्ली, ता. २६ (पीटीआय) : अमेरिकेतील बाजारपेठेत जाणाऱ्या भारतीय वस्तूंवर आकारण्यात येणारे ५० टक्के आयातशुल्क उद्या, बुधवारपासून (ता.२७) लागू होणार असून, त्यामुळे कोळंबी, वस्त्र, चामडे, रत्न व दागदागिने यांसारख्या श्रमकेंद्रीत निर्यात क्षेत्रांवर गंभीर परिणाम होणार आहे.**

अतिरिक्त आयातशुल्कामुळे अमेरिकेला होणाऱ्या भारताच्या ८६ अब्ज डॉलरच्या निर्यातीपैकी निम्म्याहून अधिक वस्तूंवर परिणाम होईल, तर औषधे, इलेक्ट्रॉनिक्स आणि पेट्रोलियम उत्पादने यांसारख्या उर्वरित वस्तूंना मात्र करमाफी मिळणार आहे. अमेरिकेच्या सूचनेनुसार, भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ९.३१ नंतर नवे आयातशुल्क लागू होणार आहे.

सध्या, अमेरिकेच्या बाजारात जाणाऱ्या भारतीय वस्तू आणि उत्पादनांवर आधीच २५ टक्के अतिरिक्त शुल्क लागू आहे. रशियाकडून कच्चे तेल आणि लष्करी उपकरणे खरेदी केल्याचे कारण पुढे करून अमेरिकेकडून भारतावर आणखी २५ टक्के शुल्क लावले जाणार आहे. निर्यातदारांच्या म्हणण्यानुसार, या शुल्कामुळे अमेरिकी बाजारातून मोठ्या प्रमाणावर भारतीय उत्पादने बाहेर पडतील. बांगलादेश, व्हिएतनाम, श्रीलंका, कंबोडिया आणि इंडोनेशिया यासारख्या देशांच्या मालावर शुल्क खूपच कमी आहे. 'ॲपेक'चे (अपेरल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल) सरचिटणीस मिथिलेश्वर ठाकूर यांच्या मतानुसार, वस्त्रोद्योग क्षेत्रातील निर्यात १०.३ अब्ज अमेरिकी डॉलर असून, त्याचा मोठा फटका या क्षेत्राला बसणार आहे. नवे आयातशुल्क लागू होण्यापूर्वीच अनेक कंपन्यांनी मोठ्याप्रमाणावर अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय वस्तू विक्रीसाठी पाठविल्याचे जुलै महिन्याच्या व्यापार आकडेवारीत दिसत आहे. जुलै महिन्यात भारतातून अमेरिकेला मालाची निर्यात १९.९४ टक्क्यांनी वाढून ८.०१ अब्ज डॉलरवर गेली, तर आयात १३.७८ टक्क्यांनी वाढून सुमारे ४.५५ अब्ज डॉलरवर पोहोचली. एप्रिल ते जुलै २०२५ या कालावधीत भारताची अमेरिकेला निर्यात २१.६४ टक्क्यांनी वाढून ३३.५३ अब्ज डॉलर झाली, तर आयात १२.३३ टक्क्यांनी वाढून १७.४१ अब्ज डॉलरवर गेली.

### निर्यात घटणार

अमेरिकेच्या नव्या शुल्क धोरणामुळे येथून आगामी आर्थिक वर्षात भारताची अमेरिकेला होणारी निर्यात मोठ्या प्रमाणावर घटून अंदाजे ४९.६ अब्ज डॉलरवर येईल, असा अंदाज आहे. एकूण निर्यातीपैकी ३० टक्के (२७.६ अब्ज डॉलर) शुल्कमुक्त राहतील आणि ४ टक्के (३.४ अब्ज डॉलर) यावर २५ टक्के शुल्क लागेल. मात्र, मोठा हिस्सा ६६ टक्के (६०.२ अब्ज डॉलर्स) असेल. त्यामध्ये वस्त्र, कापड, रत्न व दागदागिने, कोळंबी, गालिचे आणि फर्निचर यांचा समावेश आहे.

### नोकर कपातीची शक्यता

चामडे आणि पादत्राणे क्षेत्रातील उद्योजकांच्या मतानुसार, भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारानंतर दीर्घ परिणामांबाबत भाष्य करता येईल. मात्र, सध्या तरी कंपन्यांना कर्मचारी कपात करावी लागेल आणि उत्पादनही थांबवावे लागेल. रत्ने आणि दागिन्यांच्या निर्यातदारानेही नोकऱ्यांमध्ये कपातीची शक्यता व्यक्त केली. अमेरिका ही आपली सर्वांत मोठी बाजारपेठ असल्याने दागिने आणि हिरे क्षेत्रावर त्याचा परिणाम होईल, असे त्यांनी सांगितले.

### 'सेन्सेक्स' ८४९ अंश घसरला

आयातशुल्कामुळे धास्तावलेल्या गुंतवणूकदारांनी जोरदार विक्री केली आणि भारतीय शेअर बाजार निर्देशांक आज एक टक्क्याने गडगडले.आज शेवटच्या तासात 'सेन्सेक्स'ने ८१ हजारांचा स्तरही खालच्या दिशेने तोडला. आज ८४९.३७ अंश घसरलेला 'सेन्सेक्स' ८०,७८६.५४ अंशांवर स्थिरावला, तर २५५.७० अंश पडलेला 'निफ्टी' २४,७१२.०५ अंशांवर बंद झाला.



**पुणे :** 'याकुल्ट'च्या ब्रँड ॲम्बेसिडरपदी तापसी पन्नूची घोषणा करण्यात आली.

## तापसी पन्नू 'याकुल्ट'ची ब्रँड ॲम्बेसेडर

**पुणे, ता. २६ :** जपानची याकुल्ट होंशा आणि फ्रान्सची ग्रुप डॅनोन यांच्या संयुक्त मालकीच्या 'याकुल्ट डॅनोन इंडिया प्रा.लि.' कंपनीने बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू हिला आपली नवी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले आहे. प्रोबायोटिक दुग्धपेय श्रेणीची सुरुवात करून कंपनीने पचन आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशातील ग्राहक आता अधिक आरोग्यदायी पर्यायांकडे वळत असल्याने प्रोबायोटिक्स पदार्थांची मागणी झपाट्याने वाढत आहे.

'याकुल्ट'ने २००८ मध्ये भारतीय बाजारपेठेत प्रवेश केला आणि आज देशातील सुमारे ७०० शहरांमध्ये कंपनी पोचली आहे. गेल्या १७ वर्षांत कंपनीला भारतात वाढीची मोठी संधी मिळाली आहे. २०३० पर्यंत दरवर्षी दुहेरी अंकांची वाढ साध्य करणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे, असे याकुल्ट डॅनोन इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक ईजी अमानो यांनी सांगितले. याबाबत तापसी पन्नू म्हणाली, ''माझ्या कुटुंबात अनेक वर्षांपासून 'याकुल्ट'चे सेवन केले जाते. मला खात्री आहे की चांगल्या आरोग्याची सुरुवात पोटापासून होते आणि याकुल्ट ते सहज व चविष्ट पद्धतीने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवतो.''

## चैतन्यपर्वाचा आजपासून श्रीगणेशा

>> पान १ वरून

कार्यकर्त्यांची देखील मोठी धावपळ या अनुषंगाने सुरू झाली होती. देखावे, तसेच इतर सजावटीच्या कामांना वेग येण्यासाठी साताऱ्यातील अनेक मंडळांनी यापूर्वीच गणेशमूर्ती वाजतगाजत मंडपात नेण्यास सुरुवात केली होती. या आगमन सोहळ्यावेळी होणाऱ्या ढोलताशांच्या गजरामुळे साताऱ्यातील वातावरण गणेशमय होण्यास सुरुवात झाली होती.

येतोय... येतोय म्हणणाऱ्या गणरायाचे मंगळवारी सायंकाळपासूनच अनेक ठिकाणी आगमन होऊ लागले. अनेक ठिकाणी घरगुतीसह सार्वजनिक गणेशमूर्ती नेताना ढोलताशांचा गजर करण्यात येत होता. यामुळे संपूर्ण सातारा गणेशमय झाला होता. गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी, तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहरांतर्गत वाहतुकीत मंगळवारी सायंकाळपासूनच बदल करण्यात आले होते. या बदलांची काटेकोर अंमलबजावणी बुधवारी करण्यात येणार आहे. प्रथेप्रमाणे गणेशाची उद्या सर्वत्र विधिवत प्रतिष्ठापना होणार आहे.

**... तर होणार कारवाई**

शहरात सार्वजनिक गणेश मंडळांनी आगमन सोहळ्यादरम्यान प्लॅस्टिक, कागदी तुकड्यांचा समावेश असणाऱ्या फटाक्यांच्या वापर झाला. यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांवर प्लॅस्टिक, कागदी तुकड्यांचा खच पसरून अस्वच्छता झाली होती. याची गंभीर दखल घेत सातारा पालिकेने अशा फटाक्यांच्या म्हणजेच ब्लास्टच्या वापरावर बंदी घातली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणार असल्याचे मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

## चॅनल पार्टनर्ससाठी 'एसके'ची विमा योजना

**पुणे, ता. २६ :** स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने एसके फायनान्सने आपल्या चॅनल पार्टनर्ससाठी अपघात विमा योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत अंदाजे चार हजार चॅनल पार्टनर्सना प्रत्येकी चार लाख रुपयांचे विमा संरक्षण दिले जाणार असून त्याची एकूण रक्कम सुमारे १५० कोटी आहे.

या उपक्रमामुळे भागीदारांना व त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षिततेची हमी मिळणार आहे. अपघाताच्या प्रसंगी आर्थिक आधार मिळावा, हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. या प्रसंगी एसके फायनान्सचे संचालक यश सेतिया म्हणाले, ''आमच्या चॅनल पार्टनर्ससोबत मजबूत आणि दीर्घकालीन संबंध प्रस्थापित करण्याचा आम्हाला अभिमान आहे. ही भेट त्यांच्यासाठी फक्त आर्थिक सुरक्षा नाही, तर आमच्या वचनबद्धतेचा आणि आदराचा पुरावा आहे. आम्ही भागीदारांशीचे संबंध अधिक दृढ करण्यास कटिबद्ध आहोत.''

एसके फायनान्स ही उद्योग, व्यवसाय व व्यक्तींना विविध प्रकारचे कर्ज पर्याय उपलब्ध करून देणारी आघाडीची वित्तीय संस्था आहे. कंपनी सध्या १२ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांत असून ६४५ हून अधिक शाखांद्वारे ती सेवा पुरवते. सुमारे १२ हजारांहून अधिक कर्मचारी आहेत.




## 'टीव्हीएस'ची नवी रेडर सुपर स्क्वॉड

**बंगळूर, ता. २६ :** टीव्हीएस मोटर कंपनीने रेडर सुपर स्क्वॉड मोटरसायकलची नवी आवृत्ती दाखल केली आहे. ही नवी आवृत्ती मार्वलच्या डेडपूल आणि वोल्व्हरिन या दोन सुप्रसिद्ध पात्रांकडून प्रेरणा घेऊन तयार करण्यात आली आहे. टीव्हीएस रेडर ही मार्वलवर आधारित आवृत्ती दाखल करणारी भारतातील पहिली मोटरसायकल आहे. डेडपूल आणि वोल्व्हरिनचे डायनॅमिक डेकल्स असलेल्या या मोटारसायकलमध्ये शक्तिशाली तीन व्हॉल्व्ह इंजिन असून, ते सहा हजार आरपीएमवर ११.७५ एनएमचा सर्वोत्तम टॉर्क देते.

## जरांगे आंदोलनावर ठाम

>> पान १ वरून

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांचे विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) राजेंद्र साबळे मंगळवारी अंतरवाली सराटीमध्ये दाखल झाले होते. जरांगे व साबळे यांच्यात माध्यमांसमोरच चर्चा झाली. पत्रकारांशी संवाद साधताना साबळे म्हणाले, '' जरांगे यांच्याकडून त्यांच्या मोर्चाचा मार्ग जाणून घेण्यासाठी आलो आहे. यासंदर्भात त्यांच्या काही अडचणी आहेत का, हे जाणून घेण्याचा या भेटीमागचा उद्देश आहे. यापूर्वी त्यांच्याशी फोनवर चर्चा झाली होती.'' ''आम्हाला आझाद मैदानावर जाण्यासाठी कोणताही एक मार्ग द्या. तसे केल्यास मुंबईतील गणेश भक्तांना कोणताही त्रास होणार नाही, '' असे जरांगे यांनी सांगितले.

## आझाद मैदानावर आंदोलनास मनाई

>> पान १ वरून

मुंबईऐवजी खारघर येथील जागेचा पर्याय द्यावा,' असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले. तसेच, जरांगेंनी आंदोलनासाठी परवानगी मिळविण्यासाठी संबंधित यंत्रणांकडे रीतसर अर्ज करावा त्यानंतर परवानगी मिळाल्यास त्यांनी शांततेत आंदोलन करावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ऐन गणेशोत्सवात जरांगे यांनी मुंबईत येऊन आंदोलन आणि आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे त्यांना आंदोलनाची परवानगी देऊ नये, या मागणीसाठी 'ॲमी फाउंडेशन'तर्फे जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर मुख्य न्या. आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. जरांगे यांनी आंदोलनासाठी परवानगी घेतली नसल्याची माहिती महाधिवक्त्यांनी न्यायालयास दिली. न्यायालयाने त्याची दखल घेऊन जरांगे यांना प्रतिवादी करण्याची सूचना केली.




## श्री रेफ्रिजरेशन्स लिमिटेड

**(पूर्वी श्री रेफ्रिजरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)**
**नोंदणी क्रमांकः प्लॉट क्रमांक १३१/१२, एमएसईबी स्टोअर्ससमोर, विरवडे रोड, ओगलेवाडी, कराड-४१५१०५, महाराष्ट्र, भारत**
**सीआयएनः U29191PN2006PLC128377; ईमेल आयडीः cs@shreeref.com**
**दूरध्वनी क्रमांकः +912164272015; वेबसाइटः https://www.shreeref.com/**

### १९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदान आणि पुस्तक बंद करण्याशी संबंधित माहिती

१. सूचना येथे देण्यात येते की श्री रेफ्रिजरेशन्स लिमिटेड (पूर्वी श्री रेफ्रिजरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) च्या भागधारकांची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, प्लॉट क्रमांक १३१/१२, एमएसईबी स्टोअर्स समोर, विरवडे रोड, ओगलेवाडी, कराड-४१५१०५, महाराष्ट्र, भारत येथे आयोजित केली जाईल. १९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे सामान्य व्यवहार करण्यासाठी.

२. कंपनी कायदा, २०१३ आणि सेबी (एलओडीआर) नियमावली, २०१५ च्या तरतुदींनुसार, त्याअंतर्गत केलेल्या परिपत्रकासह आणि अधिसूचनेसह, सभेत करावयाच्या व्यवसायाची माहिती देणारी वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावण्याची सूचना, स्पष्टीकरणात्मक विवरणपत्र, आर्थिक विवरणपत्र (एकत्रित आणि स्वतंत्र), उपस्थिती पावती, प्रॉक्सी फॉर्म आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानासाठीचे परिपत्रक आवश्यक पद्धतीने भागधारकांना आधीच पाठवण्यात आले आहे.

३. कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने भागधारकांची नोंदणी आणि कंपनीचे शेअर हस्तांतरण पुस्तके गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५ ते मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील. ज्या व्यक्तीचे नाव अंतिम तारखेला म्हणजेच बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ रोजी ठेवीदारांनी राखलेल्या भागीदार व लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये नोंदवले गेले आहे, तीच व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेत रिमोट ई वोटिंग व मतपत्रिके व्दारे मतदान करण्याची सुविधा घेण्यास पात्र आहे. कंपनीने वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून म्हणजेच रिमोट ई वोटिंग मतदान सुलभ करण्यासाठी मेसर्स एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडची नियुक्ती केली आहे.

४. वार्षिक अहवाल २०२४-२५ आणि १९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ज्या भागधारकांचे ई-मेल पत्ता कंपनीकडे नोंदणीकृत आहे आणि रजिस्ट्रार ऑफ ट्रान्सफर एजंटकडे आहे त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवलेली आहे. शिवाय, ज्या भागधारकांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत नाहीत त्यांच्यासाठी एक पत्र पाठवण्यात आले आहे ज्यामध्ये वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती उपलब्ध असलेल्या अचूक मार्गासह वेब-लिंक दिली आहे. हे दस्तऐवज कंपनीच्या वेबसाइट https://www.shreeref.com/ वर आणि कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.bseindia.com वर उपलब्ध करून दिले जातील. २६ ऑगस्ट २०२५ रोजी ईमेलद्वारे वार्षिक सभासद सभेची सूचना पाठवण्याचे काम पूर्ण झाले आहे. भागधारकांना २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल https://www.shreeref.com/invester_1_1.php या वेब लिंकवरून डाउनलोड करता येईल.

५. पुढे भागधारकांना येथे कळविण्यात येते कीः

(i) कलम १०८ च्या तरतुदी आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ४४ सह वाचलेल्या कायद्याच्या इतर लागू तरतुदींनुसार, कंपनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्याच्या प्रस्तावित ठरावांवर मतदानाचा अधिकार वापरण्यासाठी भागधारकांना रिमोट ई वोटिंग व मतपत्रिके द्वारे मतदान करण्याची सुविधा प्रदान करण्यास आनंदित आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरून भागधारकांना मतदान करण्याची सुविधा एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड द्वारे प्रदान केली जाईल.
(ii) रिमोट ई वोटिंग कालावधी शनिवार, २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ०९:०० वाजता सुरू होईल आणि सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता संपेल. भागधारकांनी हे लक्षात ठेवावे की वरील कालावधीनंतर रिमोट ई वोटिंगला परवानगी दिली जाणार नाही. वार्षिक सर्वसाधारण सभेत मतपत्रिके व्दारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल आणि ज्या सदस्यांनी रिमोट ई वोटिंग द्वारे मतदान केलेले नाही त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करता येईल.
(iii) वार्षिक सर्वसाधारण सभेत रिमोट ई-वोटिंग व मतपत्रिके द्वारे मतदान करण्यासाठी भागधारकांची पात्रता निश्चित करण्याची अंतिम तारीख बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ आहे. ज्या व्यक्तीचे नाव बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ रोजी ("कट-ऑफ डेट") कंपनीच्या भागधारकांच्या नोंदणी आणि शेअर हस्तांतरण पुस्तकात नोंदवले गेले आहे त्यांनाच रिमोट ई-वोटिंग व सर्वसाधारण सभेमध्ये मतपत्रिके द्वारे मतदान करण्याची सुविधा मिळू शकेल.
(iv) ज्या भागधारकांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवल्यानंतर आणि अंतिम तारखेपूर्वी शेअर्स खरेदी केले आहेत त्यांना मतदान करण्यासाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळविण्यासाठी अवलंबल्या जाणाऱ्या प्रक्रियेसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेचा संदर्भ घेण्याची विनंती आहे.
(v) डीमटेरियलाइज्ड पद्धतीने, भौतिक पद्धतीने शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांसाठी आणि ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केले नाहीत त्यांच्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत रिमोट ई-वोटिंग व मतपत्रिके द्वारे मतदान करण्याच्या सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये देण्यात आल्या आहेत.
(vi) कंपनीच्या संचालक मंडळाने मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी मेसर्स मोहित सिंघल अँड असोसिएट्सचे मालक, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, श्री. मोहित सिंघल (FCS11143, COP 15995) यांची छाननीकार म्हणून नियुक्ती केली आहे आणि त्यांनी नियुक्ती होण्याची त्यांची इच्छा व्यक्त केली आहे आणि त्याच उद्देशाने ते उपलब्ध असतील. छाननीकाराच्या अहवालासह रिमोट ई-वोटिंग व मतपत्रिके द्वारे केलेल्या मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाइट https://www.shreeref.com/ वर अपलोड केले जातील आणि कंपनीच्या सिक्युरिटीज सूचीबद्ध असलेल्या BSE लिमिटेडला कळवले जातील.
(vii) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याबाबत काही प्रश्न असल्यास, कृपया insta.vote@linkintime.co.in च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या भागधारकांचे वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि भागधारकांसाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पहा किंवा क्रमांकः 022-49186000 वर कॉल करा किंवा C-101, 247 पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी वेस्ट येथे कार्यालय असलेल्या आरटीए-एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ईमेल आयडीः insta.vote@linkintime.co.in आणि दूरध्वनी क्रमांकः 022-49186000 वर कॉल करा. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित त्यांच्या तक्रारींबद्दल इलेक्ट्रॉनिक स्वरूपात शेअर्स धारण करणारे आणि त्यांचे ईमेल किंवा केवायसी तपशील अद्यावत केलेले नसलेल्या भागधारकांना त्यांच्या डीपीने सांगितलेल्या प्रक्रियेनुसार तुमच्या डीमॅट खात्यात तपशील नोंदणी/अपडेट करण्याची विनंती आहे.
सेबीच्या तरतुदींनुसार, शेअर्स धारण करणाऱ्या सर्व भागधारकांनी हे लक्षात ठेवावे लागेल की, भौतिक स्वरूपात शेअर्स असलेल्या सर्व भागधारकांना पॅन, नामांकनाची निवड, संपर्क तपशील (पिन आणि मोबाईल क्रमांकासह पोस्टल पत्ता), बँक खाते तपशील आणि त्यांच्या संबंधित फोलिओ क्रमांकांसाठी नमुना स्वाक्षरी देणे बंधनकारक आहे.
भागधारक कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ("एमयूएफजी इनटाइम") यांच्याकडे विहित नमुन्यात आणि इतर संबंधित फॉर्ममध्ये वरील तपशील नोंदणी/अपडेट करू शकतात.

**श्री रेफ्रिजरेशन्स लिमिटेडसाठी**
**(पूर्वी श्री रेफ्रिजरेशन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)**

स्वाक्षरी/-
अश्विनी घनश्याम गोडबोले
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यता क्रमांकः एसीएस २२७५९

**तारीखः २६ ऑगस्ट २०२५**
**ठिकाणः कराड**